नवराष्ट्र
www.navarashtra.com

**विपश्यना • १६४ शिबिरे, ५००० साधकांचा सहभाग; देश-विदेशातील साधकांनी घेतला लाभ**

# ध्यानकेंद्राचा ८ वर्षांचा यशस्वी प्रवास

**महाड, (वा.)** महाडमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेल्या विपश्यना केंद्राचा राज्यासह देश-विदेशातील असंख्य साधकांनी लाभ घेतला असून मनःशांतीचा आत्मिक आनंद प्राप्त केला आहे.

पुणे विपश्यना समिती बार्टी, सामाजिक न्याय विभाग, राज्य शासन आणि विपश्यना विश्व विद्यापीठ (धम्मगिरी, इगतपुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने महाड येथील या विपश्यना ध्यानकेंद्राची स्थापना ७ नोव्हेंबर २०१६ रोजी झाली. ज्ञानदेव बनसोडे, प्रशांत धिवार (सध्याचे भदंत सुमंगल) आणि महाडचे ज्येष्ठ साधक राजेंद्र जाधव यांच्या प्रयत्नांतून हे केंद्र उभारले गेले. सुरुवातीला एक वर्षाचा संपूर्ण खर्च बार्टी, पुणे संस्थेच्या माध्यमातून झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या तिसऱ्या मजल्यावर कार्यरत असलेल्या या केंद्रात दर महिन्याला दोन दहा दिवसीय, एक दिवसीय आणि बाल शिबिरे घेतली जातात.



## आठ वर्षांची यशोगाथा

- एकूण शिबिरे:१६४ (पुरुष १३५, महिला २९)
- एकूण साधक: ४९६५
- बाल शिबिरे: १०८ (३२४० मुले)
- एकदिवसीय शिबिर:१६५० साधक
- बौद्ध भन्ते : २०
- विशेष शिबिर: महिला, पुरुष, तीन दिवसीय, बाल शिबिर
- परदेशी साधक : १९ (अमेरिका, जपान, इंग्लंड, जर्मनी, कझाकिस्तान, कंबोडिया, बहरीन आदी)

## विशेष उपक्रम

२०२० पासून 'मित्र उपक्रम' सुरू असून त्याचा लाभ आतापर्यंत ३५० शिक्षकांनी घेतला आहे. दरवर्षी दोनदा होणाऱ्या 'आणापान' परिचय सत्रात सुमारे ७५० सदस्य सहभागी होतात. २० मार्च रोजी 'चवदारतळे' स्मृतिदिनानिमित्त हजारो अनुयायांसाठी १० मिनिटांची साधना आयोजित केली जाते.

## महाडमध्ये कायमस्वरूपी केंद्राची होतेय मागणी

महाडच्या ऐतिहासिक भूमीवर वसलेले हे केंद्र देश-विदेशातील हजारो साधकांना आध्यात्मिक मनःशांतीचा लाभ देत असून महाड येथील हे केंद्र कायमस्वरूपी सुरू राहावे, अशी अपेक्षा साधकांकडून करण्यात येत आहे.

## सहकार्य व व्यवस्थापन

केंद्राची देखभाल पुणे विपश्यना समिती (धम्मपुण्ण विपश्यना सेंटर, स्वारगेट) करते. जुने साधक धम्मदानातून आर्थिक मदत करतात. स्थानिक व्यवस्थापन समिती, महिला साधिका, बाल शिबिर प्रशिक्षक तसेच स्मारक व बार्टी यांच्या सहकार्याने केंद्र सातत्याने प्रगती करत आहे.